# हळबे महाविद्यालयात श्रावण बरसला

## लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात कार्यक्रम

दोडामार्ग – श्रावण महिन्यात सारी धरणी हिरवागार शालू पांघरुन नवं रुप धारण करते, निसर्गात अनेक बदल होत असतात. या प्रसन्न व मांगल्यपूर्ण चैतन्यमय वातावरणाच्या पार्श्वभूमीवर येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा व वाड.मय मंडळाच्या उद्घाटनाचे निमित्त साधून 'श्रावणोत्सव' हा पावसाळी कवितांवर आधारीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास गोव्यातील सुप्रसिध्द कवयित्री व लोक साहित्याच्या अभ्यासक प्रा. सौ. पौर्णिमा केरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी श्रावण महिन्यातील बदलांचे चित्रण करणाऱ्या कविता सादर केल्या. 'नभ मेघांनी भरले, झाड न झाड ओथंबूनी गेले,




श्रावणरंगी धून बरसली, दव बिंदूनी इंद्रधनूचे रंग खुलले, फुलाफुलांनी गीत उमलले. श्रावणातला पाऊस हा असा पाठशिवणीचा खेळ खेळणारा, आपल्यालाही एखादी सर अंगावर घ्यावीशी वाटणारा. डोंगरावरचा पाऊस, माळावरची वाऱ्यावर डोलणारी रंगीबेरंगी फुले, त्यावर फुला पाखरांचं स्वच्छंदी बागडणं, चिंब भिजणारी झाडे, उडणारे पक्षी हाच पाऊस आपल्याला जगायला प्रेरणा देतो. झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखं जगायला शिकवतो. आपल्या जगण्याला अर्थ देतो. दुःख विसरायला लावतो. एका विलक्षण आनंदाचा स्वाद आपल्या जीवनात भरतो. श्रावण पंखात भारलेले श्वास झाले ओले, ऋतु कुस बदलताना, मन आभाळ जाहलेले, निळ्या नभाच्या निळाईत, निर्झर वेडावलेले. अशा या धुंद मोहक वातावरणात चराचर सृष्टी वेडावून जाते. एक निखळ आनंद सर्वत्र ओसंडून वाहतो. फुलांफुलांतून गीत फुलू लागते. अशा विविध निसर्गरम्य कविता पान ३ वर

# हळबे महाविद्यालयात श्रावण बरसला

पान १ वरुन

त्यांनी सादर करुन विद्यार्थ्यांना काव्यरुपी श्रावणसरीत चिंब भिजण्याचा आनंद दिला. यावेळी त्यांनी कवितेचे तंत्र आणि मानवी जीवनातील तिचे महत्त्व ही सांगितले. आपल्या मनातील उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार म्हणजे कविता. अशी कवितेची साधी व्याख्या करुन तिच जीवनाला अर्थपूर्ण बनवते. जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाने श्रवण, मनन, चिंतन आणि मंथन यांचा अवलंब केला पाहिजे, आपल्यातील क्षमता ओळखून त्या विकसित कराव्यात, असे प्रतिपादन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी मराठी भाषा व वाड्.मय मंडळामार्फत वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्रावण महिन्यातील पावसाची विविध रुपे अभिव्यक्त करणारे सृजन भित्तीपत्रक व पोस्टर मेकिंग स्पर्धेचे उद्घाटन त्यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या काव्यवाचन व काव्य गायनाचा कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा झाला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पावसावरच्या विविध कविता सादर केल्या. कु. प्रणाली शेटकर हिने सासोलीचो पावस तिरपो तिरपो पडता ही कविता सादर करुन वाहवा मिळवली. उपस्थितांनी विविध गितांचाही आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी भाषा व वाड.मय मंडळाचे प्रमुख डॉ. दिलीप बर्वे यांनी कार्यक्रमाची भूमिका व महत्त्व विशद केले. त्यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर प्रा. प्रशांत ढेपे, प्रा. एम. टी. बेग, प्रा. सोनम देसाई उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती फाटक हिने तर आभार एस.एस. पाडगावकर यांनी मानले.